
# “सद्भावना दिवस”

डॉ.आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी,नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक २८/८/२०२१ ला सकाळी ११.०० वाजता “सद्भावना दिवस”या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला मुख्यअतिथी म्हणून दै.सकाळ चे कार्यकारी संपादक श्री संदीप भारंबे,कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्या डॉ.बी.ए.मेहरे,उपप्राचार्य डॉ.के.जी.रेवतकर,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.रवींद्र तिरपुडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे ६० विद्यार्थी उपस्थित होते.







किरण रोकडे, प्रकाश धरममाळी उपस्थित होते.

**डॉ. आंबेडकर महाविद्यालयात आज सद्भावना दिवस**

नागपूर : दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयात सद्भावना दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन उद्या शनिवारी (ता.२८) महाविद्यालयात सकाळी ११ वाजता केले आहे. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सहकार्याने हा कार्यक्रम होत आहे. विशेष अतिथी म्हणू 'सकाळ'चे कार्यकारी संपादक संदीप भारंबे उपस्थित राहतील. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी.ए. मेहरे तसेच विशेष अतिथी म्हणून उपाध्यक्ष डॉ. के. जी. रेवतकर उपस्थित राहणार आहे. प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे तर संचालन हर्षा सोरगिले करणार आहे.



**थोडक्यात**

**डॉ. आंबेडकर महाविद्यालयात उद्या सद्भावना दिवस**

नागपूर : दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयात सद्भावना दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सहकार्याने होणारा हा कार्यक्रम शनिवार, २८ ऑगस्ट रोजी महाविद्यालयात सकाळी ११ वाजता होईल. विशेष अतिथी म्हणून संपादक संदीप भारंबे उपस्थित राहतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. ए. मेहरे तसेच उपाध्यक्ष डॉ. के. जी. रेवतकर यांची प्रमुख उपस्थिती राहील. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे तर सूत्रसंचालन हर्षा सोरगिले करतील.




Dr. Ambedkar College, Dikshabhoomi,
Nagpur
National Service Scheme


Dr. Ambedkar College, Dikshabhoomi,
Nagpur
National Service Scheme
GPS Map Camera
Nagpur, Maharashtra, India
Deekshabhoomi, Nagpur, Maharashtra
440010, India
Lat N 21° 7' 48.36" Long E 79° 4'
2.6832"
28/08/21 11:30 AM
30.99° C
331° NW
31.0 μT
Google


Dr. Ambedkar College, Dikshabhoomi,
Nagpur
National Service Scheme
"Sadbhavna Diwas"
/2021 Time :11.00 AM


GPS Map Camera
Nagpur, Maharashtra, India
Deekshabhoomi, Nagpur, Maharashtra
440010, India
Lat N 21° 7' 48.36" Long E 79° 4'
2.6832"
28/08/21 11:21 AM
30.99° C
281° W
31.0 μT
Google


Dr. Ambedkar College, Dikshabhoomi, Nagpur
National Service Scheme
"Sadbhavna Diwas"
Date: 28/08/2021 Time : 11:00 AM


Dr. Ambedkar College, Dikshabhoomi, Nagpur
National Service Scheme
"Sadbhavna Diwas"
Date: 28/08/2021 Time : 11:00 AM


GPS Map Camera
Nagpur, Maharashtra, India
Deekshabhoomi, Nagpur, Maharashtra 440010, India
Lat N 21° 7' 48.36" Long E 79° 4' 2.6832"
28/08/21 11:26 AM
30.99° C
212° SW
31.0 μT
Google



# दुसऱ्याचे दुःख बघून डोळ्यात अश्रू यायला हवेत

**प्राचार्या मेहरे : सद्भावना दिन कार्यक्रम उत्साहात**



नागपूर : सद्भावना दिनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थी.



डॉ. बी. ए. मेहरे



डॉ. रवींद्र तिरपुडे

**नागपूर, ता. २८ :** असमानतेला मानव मुल्याधारित प्रयत्नांनी दिलेली मात म्हणजे सद्भावना होय. सद् अधिक भावना अर्थात चांगल्या भावना. परस्परांबद्दल आदर, प्रेमभाव ही खरी माणुसकीची ओळख होय. दुसऱ्याचे दुःख बघून संवेदनशील व्यक्तीच्या डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहत नाही. सद्भावनेचे महत्त्व युवा पिढीने ओळखून मार्गक्रमण करावे, असे प्रतिपादन डॉ आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमीच्या प्राचार्या डॉ. बी.ए. मेहरे यांनी केले. सद्भावना दिनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

देशाचे पहिले युवा पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ २० ऑगस्ट रोजी देशभरात सद्भावना दिन साजरा केला जातो. भारत एक विविधांगी देश आहे. या देशाची विविधता कायम स्वरूपी टिकविण्यासाठी युवा पिढीने प्रयत्न करावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. यावेळी मंचावर प्राचार्या डॉ. बी. ए. मेहरे यांच्यासह 'सकाळ'चे कार्यकारी संपादक संदीप भारंबे, उपप्राचार्य डॉ. के. जी. रेवतकर, मराठी विभागप्रमुख डॉ. दीपककुमार खोब्रागडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक तथा कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे उपस्थित होते. तत्पूर्वी, प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना सद्भावनेची शपथ दिली. तथागत गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करण्यात आले. सद्भावना गीताने कार्यक्रमाची सुरवात झाली. डॉ. डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्याची माहिती दिली आणि आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन हर्षला सोरगिले हिने केले.

### विकासासाठी सद्भावनेची गरज

**वैयक्तिक असो की, देशाच्या विकास त्यासाठी सद्भावनेच्या वातावरणाची मोठी गरज आहे. दिवंगत राजीव गांधी यांनी एका सक्षम युवाराष्ट्राचे स्वप्न बघितले होते. आज जगभरात भारताची जी ओळख आहे. त्यात राजीव गांधी यांच्या धोरणांचे मोठे योगदान आहे. केवळ स्वतःपुरते न जगता जो दुसऱ्यासाठी जगला तोच खरा मानव होय, असे प्रतिपादन 'सकाळ'चे कार्यकारी संपादक संदीप भारंबे यांनी केले.**



## 'दुसऱ्यांच्या दुःखात स्वतःचे दुःख जाणा'

**नागपूर :** भारतरत्न राजीव गांधी यांनी देशात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा पाया रचत आधुनिक भारताच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या आदर्शांना सामोरे ठेवत विद्यार्थ्यांनी सद्भावनेचा गुण अंगिकारून मार्गक्रमण करावे. दुसऱ्याच्या दुःखात स्वतःचे दुःख शोधणे हीच खरी मानवता आणि सद्भावना आहे, असे प्रतिपादन संपादक संदीप भारंबे यांनी केले. दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजच्या रासेयो विभागातर्फे आयोजित राजीव गांधी जयंती 'सद्भावना दिन' कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्राचार्या डॉ. भूवनेश्वरी मेहेरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्या मेहेरे यांनी, विद्यार्थ्यांनी आपले जीवन मानवी कल्याणासाठी समर्पीत केले पाहिजे सर्वांनी धर्म, पंथ, जाती विसरून मानवी जीवन अधिक कसे फुलविता येईल, यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन केले. डॉ. तिरपुडे यांनी, कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे विद्यार्थ्यांना महापुरुषांचे प्रेरणादायी विचार आणि त्यांच्या कार्यासंबंधी माहिती दिली जाते, असे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.